# IV

# STORY - 2

## HOW CAN MY FATHER'S FAMILY LIFE BE MINE?

# बाबांचा संसार माझा कसा होणार ?

आज कितीक दिवस मी पाहाते आहे. आईवडिलांशी पटवून घेणेच मला अशक्य झाले आहे. याचा दोष माझ्याकडे नाही, असे मी कसे म्हणू ? पण तितकाच तो माझ्या आईवडिलांकडेही आहे, असे मला वाटते. कधी कधी असेसुद्धा वाटते, की प्रत्यक्ष जन्म देणारी आई न बाप जरी झाली तरी त्यांचे प्रेम अगदीच निःस्वार्थी असते, असे नाही. असे बोलायला लागले, की तुम्ही हसाल, नावे ठेवाल ! तेव्हा त्याआधी माझे म्हणणे मी तुम्हाला सांगते, आणि तुम्हीच माझ्या प्रश्नाचा निकाल लावा.

माझे आईवडील गरीब घराण्यातील आहेत. वडिलांना सत्तर रुपये मिळतात. पण आम्ही भावंडे सहा आहोत. मी सगळ्यांत मोठी. आमची एका पाठोपाठ बहिणींची पंगत पाहून कित्येक आयाबाया आईला सांगत की तुम्ही मुलींचे लग्न करा म्हणजे मुलगा होईल. एकदा आईबापांच्या स्वाभाविक इच्छेप्रमाणेही माझे लग्न करावे, असे त्यांच्या मनात प्रथम होते. पण योग्य स्थळ मिळाले नाही. पुढे पहिला भाऊ झाला. त्यानंतर माझ्या लग्नाचा प्रश्न बाजूस राहून मला ग्रॅज्युएट करायचे नक्की ठरवले. त्याची दोन कारणे असतील. आपल्या गरीबीच्या संसाराची ओढाताण त्यांना जाणवतच होती. त्यावरून प्रसंगच आल्यास मुलीला निदान पोटापुरते मिळवण्याइतकी ताकद आल्याशिवाय संसारात ढकलणे बरे नाही, असे त्यांना वाटले असावे. दुसरी स्वाभाविक इच्छा कदाचित हीही असेल, की मुलगी शिकली तर काही दिवस मुलीकडून आपल्या संसाराला हातभार लागेल. दोन्हीही इच्छा वावग्या नव्हत्या. हल्लीच्या काळात मुलांपेक्षा मुलींना नोकऱ्या लवकर मिळतातही. त्यांनी माझे शिक्षण पुरे करायचे ठरवले एवढे खरे.

आता बोलूनचालून कॉलेजात जाणारी मुलगी मी. मला काहीच लागणार नाही का ? पुस्तके हवीत, फी हवीच. नाही म्हटले, तरी वडिलांची शक्ती पिळून काढणारा खर्च माझा होई. अजून दुसऱ्या भावंडानी शिक्षणात फारशी मजल मारली नसल्याने शिक्षणाचा मोठा खर्च असा माझाच होई. मला त्याची रूखरूख असे. पण मी तरी काय करणार ? तरी मी किती साधेपणाने राही; पण आई आपली सारखी बोलत असे, की तुला हेच लागते, तेच लागते. एवढा खर्च करायचा न् पुढे या दुसऱ्याच्या घरी जायच्या ! कशाला हा बुडित खर्च ? तिचे म्हणणे खरे असले, तरी त्या स्पष्ट बोलण्याचा मला राग येई. त्याला माझा इलाज नव्हता. या गोष्टी न बोलताच जाणायच्या असतात, असे नाही का ? कसेही असो, माझे शिक्षण झाले. आज सात वर्ष नोकरीही झाली.

परवाचे बाबांचे शब्द माझ्या अगदी जिव्हारी लागले. कशावरूनसे निघाले होते. मी म्हटले कसे बाबांना, "बाबा, अडीअडचणी आपल्यासारख्याच्या घरात आल्या की काही मागे शिल्लक नसल्याने मोठी पंचाईत होते नाही का ? तर मी पंचवीस रुपये दरमहा मागे टाकू का ?"

त्यांना माझ्या बोलण्याचे इतके वाईट वाटले की पुसता सोय नाही. ते म्हणाले, "हेच, हेच ते. पैसा मिळायला लागला, की ज्याला त्याला आपलं म्हणून काही तरी सुचायला लागतं. मग हळूहळू आई नाही ! बाप नाही ! भाऊ नाही व भावंडं नाहीत ! "

मला अगदी आश्चर्य वाटले. मी म्हटले, "बाबा, उद्या जर काही अचानक खर्च आला तर ? नको का आधी विचार करायला ?"

त्यावर ते उसळून म्हणाले, "मला सगळं कळतं आहे. ज्याचे त्याचे स्वार्थ निर्माण झाले, की कुटुंबाची धुळधाण व्हायला काही वेळ नाही. आली अडचण तर पाहू मग. सध्या म्हणतात तशातलं-रोजचं कसं होईल ही भ्रांत आहे !"

मी काही आता लहान नव्हते. आज सात वर्षे मी नोकरी करीत होते. तरी सुद्धा माझ्यात व इतर भावंडांत काहीच फरक नव्हता काय ? समजा, आज नाही उद्या मी लग्न कराचे म्हटले तर स्वतःजवळ पैसुद्धा शिल्लक नाही. अशा स्थितीत व्हायचे कसे ? मी. बी. ए. जरी झाले, तरी लग्नाच्या पात्रतेचे ते प्रमाणपत्र होऊ शकत नाही. ती उलट अपात्रताच ठरते. कारण सुशिक्षित व विशेषतः अविवाहित स्त्री म्हटली, की समाज कान टवकारतो. जेथे प्रेमविवाह असेल, तेथे कदाचित नसेल प्रश्न. पण मला ते कसे शक्य होणार ! लोकापवादाच्या भीतीमुळे मी कोणात मिसळू शकत नाही. आईबाबांनाही ते आवडणार नाही.

बरे, मग लग्नाला उभी राह्यले, तर दोहोंकडील खर्च करून लग्न करून घ्या, असे वरपक्षाला सांगायचे की काय ? त्यात माझ्या आई-वडिलांना काहीच वाटणार नाही ? निदान माझ्या स्वाभिमानाला धक्का बसेल खास !

परवा मात्र मी बाबांच्या जवळ पैसे शिल्लक टाकण्याबद्दल बोलले, तेव्हा त्यांनी असे काही विपरीत उद्गार काढले ! पस्तिशी उलटलेल्या कुमारिकांची उदाहरणे देऊन त्यांनी म्हटले, "त्या नाही का राहात ? मग तूच एवढी उतावीळ का ? आणि एव्हापासून पुढची काळजी का करतेस ?"

मी मनात म्हटले, "खरं आहे. त्यांची पस्तिशी उलटली आहे न माझी तिशीच उलटते आहे. तेव्हा मी का काळजी करायची ? तिशी भरली तरी मी उतावीळच !"

...AR LIBRARY
...IVA... ...Y, KOLHAPUR

बाबा म्हणाले, "मुलांची गोष्ट निराळी, मुलींची काही तशी नाही. मुलांना तसं राहणंच कठीण जातं. मुली सुशिक्षित असल्या की त्यांना कसली आली आहे भीती ? मुली काही मुलांइतक्या भडकून जात नाहीत." मी मनात म्हटले, "खरंच, भीती असते, म्हणूनच जणू लग्न करायचं

असतं ! ! मुली स्वतःच्या तोंडाने बोलू शकत नाहीत, म्हणून त्यांना भावनाही नाहीत ! चांगलं आहे हे तत्त्व !''

पुढे बाबा म्हणाले, ''कितीतरी बालविधवा सदाचाराने शेवटपर्यंत राहू शकतात. उलट ब्रह्मचारी पुरुष हजारात एखादा नाही मिळायचा. बायकांची मनं उच्छृंखल होऊ शकत नाहीत आणि दुसरं असं, की संसार हे क्षणिक सुख आहे. मी तर म्हणेन, गरीबाने या भानगडीतच पडू नये !''

मला राग आला न् हसूही आले -

'आजपर्यंत सगळीच माणसं संसाराची असारता सांगत आली आहेत. बाबांना सुद्धा असं कुणी आधी सांगितलंच असेल की ! पण ही चूकच अशी आहे, की कळून सवरून प्रत्येकाला करावीशी वाटते म्हणून तर जग चाललं आहे. नाही तर मोठा कठीण प्रसंग येता !''

अर्थात् हे शब्द मी मनात म्हटले; पण ते अगदी ओठांवर आले होते ! त्या दिवशी बाबांनी जवळ जवळ स्पष्टच सांगितले, की जरी तुला वाटत असले, तरी तुला लग्न करता येणार नाही.

ते म्हणाले, ''आम्ही केला मूर्खपणा. नको होता एवढा संसार वाढवायला. पण आता काही मारून तर नाही टाकायची पोरे. आम्ही मेलो तर ती गल्लोगल्ली हिंडतील ! कुटुंबाकरता स्वार्थ सोडला पाहिजे. या आपपरभावानेच तर सगळे बिनसते. ज्याने त्याने आपलेच पाह्यचे मनात आणले, तर कसे व्हायचे ? तू तरी स्वतःबद्दलचा दूरचा विचार कशाला करतेस ?'' मला त्या दिवशी काय बोलावे हेच कळेना. मला असल्या बोलण्याचा तिटकाराच आला; बाबांचे बोलणे त्यांच्या दृष्टिने ठीकच असेल कदाचित. मला त्यांची मनःस्थिती कळत का नाही ? पण त्यांच्या मनाप्रमाणेच मलाही मन आहे, मानवी भावना आहेत, त्याला मी काय करू ?

माझी आई कशीही असली अगर बाबा कसेही असले व या गरिबीमुळे नको ते शब्द त्यांनी उच्चारले, तरी त्यांच्यामागे प्रेम आहेच, हे मी विसरू शकत नाही. दारिद्र्याच्या कठोर आघातांनी मायासुद्धा हृदयाच्या कोठल्या कोपऱ्यात दडून बसते आणि दारिद्र्याला तोंड देण्यासाठी वज्राचे कवच घेते. माझ्या आईवडिलांचे उणे-अधिक बोलणे झाले, म्हणजे त्या क्षणी मला फार राग येतो. पण पुनः हेच वाटते, ही काही झाले तरी ती 'आई' न् ते 'बाबा' आहेत. कठोर असा एकच शब्द ते बोलले, पण त्याबरोबर लहानपणापासूनच त्यांच्या कोट्यावधी मायेच्या शब्दांनी न् प्रेमळपणानेच तू लहानाची मोठी झाली ना ? तेवढ्या शब्दांनीच कृतज्ञ मनाने आठवण कर म्हणजे कठोर शब्द कुठल्या कुठे विरून जाईल असे मी मला सांगे.

मात्र मला शांतपणाने विचार करूनही एक कोडे उकलत नाही, की बाबांचा संसार माझा व्हायचा कसा ? त्यात आपपरभाव नष्ट करायचा कसा ? माझा संसार म्हणजे मुलांचा संसार नाही. तो दुसऱ्याच्या घरी जाऊन करायचा. त्यांची सुखदुःखे त्यांना, माझी मला.

बाबांचे विचार ऐकून मी थक्क झाले. त्यांना तरी माझे बरे होऊ नये असे खात्रीने वाटत नसेल. पण गरीबीच्या चरकाने त्यांच्या संसाराची अशी काही चमत्कारिक आणि नाजुक स्थिती झाली आह, की त्या निराशेच्या व भीतीच्या दडपणामुळेच केवळ त्यांच्या तोंडून त्या दिवशी असे बदसूर निघाले. मी खूप रडले. माझी विचारसरणी वडिलांना कशी कळत नाही ? ती मी बोलू कशी ? बाबा तरी एकदा तरुणच होते ना ?

हे त्यांना कळत नाही म्हणूनच मला कधी कधी वाटते, की आईबापांचे प्रेमही व्यापारी प्रेम असते. मुलांकडून मोबदला न मिळाला तर प्रेमाचे नाणेही खणखणीत वाजत नाही. मग त्याला हवे तर व्यवहार म्हणा. पण त्या मोबदल्याकरिता मनुष्याचे मन थोडे तरी विकृत होईलच होईल. माझ्या भवितव्याचा विचार करू लागले की बाबा मला स्वार्थी म्हणतात. पण त्यांच्या संसाराकरिता का होईना, माझ्या भावना दूर झुगारून देणारे बाबासुद्धा त्याच दोषाचे मालक होत नाहीत का ?

कित्येक वेळा मला एका गोष्टीबद्दल गूढ वाटते आणि ते म्हणजे स्वार्थ कशाला म्हणायचे नि निःस्वार्थ कशाला म्हणायचे ? मला तरी वाटते, की स्वार्थ हा शब्द बहुरूपी आहे. एका बाजूने तो पूर्ण स्वार्थ वाटेल तर हळूहळू रंग पालटीत तोच स्वार्थ निःस्वार्थासारखा दिसू लागेल. निःस्वार्थ म्हणून ज्याला आपण म्हणतो, तोसुद्धा एका अर्थी स्वार्थच नाही का ?

एका मानसशास्त्रज्ञाने म्हटले आहे की, एखाद्या मनुष्याने एखादे वाईट कृत्य केले तर आपण रागावतो, नि त्याला सुधारण्यासाठी धडपडतो. त्यात खरे म्हणजे तो वाईट असण्यात आपल्याला एक प्रकारे दुःख असते. ते आपले स्वतःचे दुःख नाहीसे व्हावे म्हणून आपण त्याला सुधारण्याची खटपट करतो. आईबाप मुलांना शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात. का तर मुले चांगली व्हावी म्हणून. पण मुले चांगली व्हावी हे तरी त्यांना का वाटते ? तर मुले वाईट असण्यात त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणाला जे दुःख असते ते कमी व्हावे म्हणून !

एखादा मोठा वंद्य पुरुष स्वार्थत्याग करतो याचा अर्थ स्वार्थत्याग करण्यात सुख असते, स्थार्थत्याग त्याने केला नाही तर त्याला दुःख वाटते. खरोखर ही विचारसरणी खरी असली तर कोणाही निःस्वार्थी माणसाला त्याच्या सुकृत्याचे फळ कोणीही देणार नाही. जो तो म्हणेल, ''स्वार्थत्याग ? अहो हे ढोंग आहे. स्वतःच्या सुखासाठीच हे सगळे. त्यात कसली स्तुती न कसला गुणगौरव ?''

याही पलीकडे जाऊन शास्त्रज्ञ भावनाशून्य अंतःकरणाने कसा विचार करतात हे पाहाण्यासारखे आहे. प्लेटोने का कुणीसे म्हटले आहे, की 'आई सुद्धा मुलाला का पाजते, तर दुग्धधारा दाटून आल्याने तिच्या अंगच्या कळा कमी व्हाव्या म्हणून ?' मी ज्या वेळी हे वाक्य वाचले तेव्हा मला अगदीच पटले नाही. वाटले, बोलून चालून निर्घृण हृदयाचा शास्त्रज्ञ ! त्याने असे नाही तर कसे उद्गार काढायचे ? आईबद्दल असे उद्गार ! मग जगातील इतरांना आपमतलबी म्हणायला ह्या शास्त्रज्ञांना काय कठीण जाणार आहे ?

पण अनुभवाने जर या विचारसरणीचे पाह्यचे म्हटले तर हे बरेचसे खरे असावे असे वाटू लागते. स्वत्वाची भावनाच मुळी स्वार्थ खेचून आणणारी आहे. 'माझं कुटूंब', 'माझी आई', 'माझे बाबा', 'माझा भाऊ', 'माझी बहीण' असे जेव्हा जेव्हा मी म्हणते, तेव्हा तेव्हा कुटुंबावर अथवा प्रत्येक व्यक्तीवर माझे जे प्रेम असते, ते स्वार्थावरचे अवगुंठण असते. स्वार्थच प्रेमाचा बुरखा घेऊन वावरत असतो. त्याच्यात काही चांगले-वाईट, किंवा काही तर-तम अशी प्रतवारी असणे, याचा परोक्ष व अपरोक्ष संबंध 'माझ्या'शी असतो. माझ्यातील 'मी' वर त्याचा परिणाम होत असतो.

तो सुखदायक परिणाम व्हावा म्हणूनच, म्हणजे स्वार्थानेच मी या सर्वांचे चांगले चिंतीत असते. त्या 'मी' वर यांचे चांगले होण्याचा परिणाम तितकासा सुखदायक होत नाहीसा झाला व माझेच केवळ चांगले होण्याने मला सुख होऊ लागले, की मी 'स्वार्थी' झाले. कारण इतरांच्या सुखाची मी उपेक्षा केली; ते थोडे फार कमी झाले.

माझे तसेच आईबापांचे नाही का ? त्यांची स्वार्थाची व्याप्ती मोठी असते. ती मुलांकडे, पोटच्या गोळ्यांकडे स्वतः इतक्याच आस्थेने, आत्मीयत्वाने पाहातात म्हणूनच कुटुंबाची उन्नती ती आपली उन्नती, तेच आपले सुख अशी त्यांची विचारसरणी असते. कुटुंबाची उन्नती ती आपली असे म्हणणारे आईबाप निःस्वार्थी असे आपण म्हणतो. त्यांनाही असेच वाटते. ती स्वतःचे शरीर झिजवीत असतात; सर्वस्व कुटुंबासाठी खर्च करीत असतात. पण पुन्हा प्रश्न हाच येतो, की ती असे का करतात ? त्यात त्यांच्या अंतरात्म्याला सुख होते म्हणून. स्वतःच्या सुखाची गोष्ट करणे व आईबापांनी स्वतःच्या सुखाची गोष्ट करणे, हे दोघांचे स्वार्थच खरे. पण तऱ्हा निराळी ! एखादे मूल 'ढ' असणे, आळशी असणे, त्याला सुरेल आवाज नसणे, त्याचा परजातीयाशी अथवा परधर्मीयाशी विवाहसंबंध येणे, एक ना दोन, हजारो तऱ्हा आईबापांना दुःखाच्या असतात. काही गोष्टी कुलाला लांछन, काही गोष्टी त्यांना स्वतःला लांछन, काही त्यांच्या जातीला लांछन अशा त्यांना वाटतात. स्वकुल, स्वजाती, स्वधर्म इत्यादी गोष्टींतील स्वत्वाला धक्का लागल्याने आईबाप दुःखी होतात. त्यांना सुख मिळत नाही. मुलाने 'असं नसावं', 'असं करू नये' असे त्यांना वाटते. त्याच्या उलट मुलाला 'तसं असण्यात', 'तसं करण्यात' सुख असते. दोघांची सुखे निराळ्या तऱ्हेची. आईबापांचा स्वार्थ 'कुल, जाती, धर्म, अपत्य यांबद्दल वाटणारे प्रेम' असे नाव घेतो, तर मुलाला 'कुल-जाती-धर्म याबद्दल काही वाटत नाही, केवळ स्वतःबद्दलच वाटते' म्हणून त्याला स्वार्थी म्हणायचे.

एकूण सर्वांचा सगळाच स्वार्थ नि सगळाच निःस्वार्थ. प्रश्न केवळ व्याप्तीचा ! त्यामुळेच तो चांगला-वाईट ठरत असतो.

मी सुद्धा स्वार्थी आहे. माझे प्रेम आईवडिलांवर कोठपर्यंत ? तर माझ्या स्वार्थाच्या आड आले नाही तोपर्यंत ! पण माझ्या भावनांना दूषण न देता, त्या स्वाभाविक आहेत, असेच नको का त्यांना वाटायला ? आणि तसे त्यांना अंतःकरणात वाटतही असेल ! जी आईबापे असे बोलतात, तो त्यांचा दोष नसून त्यांना भेडसावणाऱ्या परिस्थितीचा आहे हेही खरे. एवढेच कशाला, तुम्ही म्हणायच्या आधी मीच असे म्हणते, की मुलींना शिकवणाऱ्या आईबापांचा पैसा हा त्यांना परतफेडीच्या दृष्टीने मुळीच उपयोगाचा नसतो. मुलगा पित्याचे ऋण फेडतो, आम्ही ऋणाला मात्र कारण होतो. खरा मुलगाच तारण होऊ शकतो. माझ्याऐवजी मुलगा असता तर किती बरे झाले असते, असे उतार वयात बाबांना वाटत असेलही.

आईबाबा पुरी निःसमर्थ झालेली. त्यांनी काय करायचे. न या अफाट जगात त्या पोरांनी काय करायचे ? ज्या घरात एक मुलगी बी.ए. होऊन मिळवती झालेली, तिथे तिच्या आईबापांना आपली इतर मुले वारांगुळीला लागलेली उघड्या डोळ्यांनी कशी बरे पाहवतील ? अशा भीषण परिस्थितीत त्यांनी माझ्याकडे नाही तर कुणाकडे पाहायचे ?

असे विचार आले, की काही काळ मला सुचत नाहीसे होते; पण लगेच असेही वाटते, की आईबाबांच्या मागे मी कुणीकडे पाह्यचे ? मलाही कठोर जगाशी एकाकी टक्कर देणे कठीण नाही का ? अगदी याच विचारांनी मी माझ्या भवितव्याचा विचार करू लागते !

आईबापांच्या मागे लहानग्या चार भावंडांना जवळ करून तोच 'माझा संसार' मानून राहण्याइतके धैर्य, खंबीरपणा माझ्यात नाही. त्याला मी तरी काय करणार ? तो माझा दुबळेपणा आहे. ज्यांना ते जमेल त्या मुलींना मी 'वंद्य' मानीन.

बरे, आताच लग्न न करता असेच राह्यचे काही दिवस म्हटले, तर आईवडिलांची सुस्थिती लवकर येण्याची आशा आहे का ? आणि बोलू नये ते बोलते, उद्या उशिरा लग्न केल्यानंतर मला मुलेबाळे झाली तर म्हातारपणापर्यंत पहिल्या मुलाचे तरी शेवटपर्यंत शिक्षण वगैरे मला करता येईल का ? त्यांच्या आधीच आम्ही 'राम' म्हटले तर त्यांचे कसे व्हायचे ? आईबापांपेक्षाही आमचा संसार भयंकर होणार नाही काय ? इतका दूरवर विचार केल्याबद्दल तुम्ही मला किती हसाल ! किती दुषणे द्याल ! कितीक आईबाप तर म्हणतील, की मुलींना शिक्षणही देऊ नका न त्यांच्याकडून अशी बेअब्रूची बोलणी पण नकोत. माझी कथा स्पष्ट सांगितल्याने आईबापांची मने शिक्षणाविरुद्ध बिथरविल्याचे पातक मला लागेल. पण मी काय करणार ? आपल्या देशात ओढवलेल्या दारिद्र्यामुळे कुटुंबसंस्थेचे पायेही गदागदा हालल्याशिवाय राहणार नाहीत. आईबापांसारख्यांचे जिव्हाळ्याच्या प्रेमाचे पाशही थरारल्याशिवाय राहणार नाहीत. गरीबीमुळे वा अन्य कारणांनी मुली प्रौढ होईतो अविवाहीत राहणार अन प्रौढ विवाह हवेत म्हटले, तरी पुरुषांत मिसळणेही आम्ही अनीतीचे समजणार ! इकडे विवाहासाठी त्यांना शिक्षण देणार, पण शिक्षण नि प्रौढ वय यांनी मुलींच्यात आलेले व्यक्तित्त्व आम्हाला खुपणार. एकीकडे आईबापांची विचारसरणी अशी नि दुसरीकडे मुलींचे मुलींना प्रश्न असणार. तेव्हा कसा काढावा यातून मार्ग ? कुणाच्या स्वार्थापुढे कुणी नमावे ?

मला तर यातून मार्गच दिसत नाही. स्वतःबद्दल विचार करणे हे निसर्गाला धरूनच आहे. सृष्टीचाही संसार असाच नाही का ? पुष्पफळांनी वृक्ष पल्लवित होतो. त्यातील बीही परिपक्व झाल्यावर वृक्षाने त्यांना सदैव आपल्या शाखांवर धारण करायचे म्हटले तर ते शक्य कसे आहे ? ती फळे गळून दुसऱ्या ठिकाणी पडायची व त्यांची दुसरी वृक्षफुले निर्माण व्हायची, हा तर सृष्टिक्रम आहे. ज्या झाडाचे फळ त्याला ते कधीच लाभत नाही. मग दोघांनी हळहळून उपयोग काय ? त्यामुळे मला कधी कधी असे वाटते की अशा परिस्थितीत ज्या त्या मुलीने आपला प्रश्न आपण हवा तसा सोडवावा. असले गुंतागुंतीचे प्रश्न आपल्यासाठी दुसरी सोडवू शकत नाहीत !

# HOW CAN MY FATHER'S FAMILY LIFE BE MINE

For the past few days I have noticed that it has become immpossible for me to get along with my parents. How can I say that I am not to be blamed ? But I feel that it is equally my parents fault. Sometimes I get the impression that even if it is the mother who has given birth, and the father, their love for us is not entirely unselfish. If I start talking this, perhaps you will laugh at me or critisize me. So let me first tell you my story and then you can give your your verdict.

My parents belong to a poor family. Father gets seventy rupees, but we are six siblings. I am the eldest. On seeing this row of sisters my mother's friends used to advise her to marry her daughter off so that she would get a son. At one times, as is the natural wish of parents, they wanted to marry me off but they couldn't get a suitable proposal. Thereafter, my first brother was born. After that, the question of my marriage remained aside and it was decided to make me a graduate. There may be two reasons for this. My parents were themselves feeling the strain of their life of poverty. So they may have thought that it was not proper to marry their daughter off before she became able to earn at least for her survival in difficult times. Another natural desire may perhapes have been that if educated,their daughter could, for some time, supports their family. Both their desires were not

unreasonable. Nowadays girls do get jobs sooner than boys. Whatever the reasons, the fact is that they decided to complete my education.

I was but a college going girl. Wouldn't I need some things? I needed books and I had to have money for the fees. The expenses were a drain on my father's energies. None of my brothers and sisters had advanced much in their education. So a major part of the expenditure on education was incurred on me. I used to feel very concerned about this. But what could I have done? Though my living was very simple, Aai always used to say " All the time you need this and that. We will spend so much money on you and in future you will go to someone else's house. Why should lose all this money ?" Though what she said was true, I used to get angry at her candid expression. I couldn't help it. These things are to be understood without being discussed. Isn't that so ? However, my eduction was completed. I have even been doing a job for seven years now.

Baba's words the other day hurt me very much. I said to him, "Isn't it that when difficulties arise in a house like ours, they create a big problem because we don't save much ? So I keep aside twenty five rupees every month ?"

My remark distressed him beyond words. He said " This is it. This is what happens. As sooon as they start earning, they start getting ideas of their own. Then gradually neither mother nor siblings matter."

I was very surprised. I said, " Baba, suppose suddenly tomorrow, some expense arises? Should not provide for it in advance?" On this he flared up and said, " I understand everything. If everybody starts becomming selfish then the family will be destroyed in no time. We will see when the problem comes. Presently I am worried about our day to day problems."

I was no longer a small girl. I had been working for seven years, so wasn't there any difference between me and my other siblings ? Suppose today or tommorow if I thought of marrying, I hadn't a penny to myself. Even though I am a B.A., it is not a certificate of my eligibility for marriage. On the contrary, it makes me ineligible. Because an educated and especially an unmarried girl draws stares in society. With a love-marriage perhaps ,the queston does not arise .But how could be that possible for me ? I cannot mix with people due to fear of gossip. My parents too will not like it .

Well, even if I decide to get married , are we going to tell the bridegroom's family to take care of the expenditure on both sides and get the marriage done? Wouldn't my parents feel awkward? At least my self-respect would get definitely hurt.

But when I talked to baba about saving money the other day, he talked so adversely. He gave me an examples of unmarried girls who have passed the age of thirty-five and said, "Aren't they living? Then why are you so impatient ? And why do you worry about future right now ?

I said to myself, "Yes that is true. They have passed thirty-five and and I am just crossing thirty, so why should I worry? But inspite of my thirty years I am impatient!".

Baba said ,"Its a different case with boys but not with girls . It is very difficult for boys to remain unmarried .If girls are educated what is there to be afraid of? Girls are not affected like that."I said to myself,"Indeed ,as if people get married because they are afraid of something! Since girls can't talk does it means that they have no feelings? Its a nice concept, it is !"

Baba went on, "Many young widows can lead a life of good conduct . But we don't find an unmarried man in a thousand . Women's minds are never distracted and morever , all these worldly pleasures are momentary. I say,a poor person should not indulge in sush affairs ."

I got very angry but at the same time it made me laugh. For ages people heve been talking about illusory nature of this world. Somebody have told this to baba also ! But this is one mistake which everybody wants to make. And that is why the world goes on. Otherwise things would have been difficult !

Of course, I said all these words to myself. But they had almost come up to my lips . That day baba nearly made it clear to me that I couldn't marry even if I wanted to .

He said ,"We did a stupid thing . We shouldn't have let our family grow this big. But now we can't kill our children If we die they will all wander in the streets. You must give up your selfishness for the family. It is this selfishness that destroys everthing. How can things go on if everybody starts thinking only about himself? Why do you think about your future ? "That day I Just didn't know what to say.I felt that this talk was disgusting. May be from his point of view what baba said was true. Can't l understand his mental state ? But I too have a heart and human feelings. I can't help that.

Whatever kind of persons my parents may have been, Aai-Baba used words when they shouldn't have because of their poverty. l cannot forget that there is love behind all this. Because of the hard blows of poverty love also hides itself in one corner of the heart and puts on an armour of steel to face poverty. Whenever they would talk so conceitedly, l would get very angry at them at that moment. But again I would feel, whatever happens they are my Aai-Baba. If they said one harsh word, haven't they also brought you up with millions of affectionate words and love ? Remember only those lovely words with a greateful heart, I would tell myself, so that all those harsh words will disappear.

But even after thinking calmly I can't solve one mystery. How can my father's family life be mine ? In this situation how can I destroy the distinction between my own and other's ? My family also won't be that of my children. Their family will be created in somebody else's house. They will have their sorrow and happiness and l will have mine.

I was astonished to hear Baba's thoughts. Definitely he didn't wish ill of me. But crushed between the mills of poverty the condition of his family had become so odd and precasious that weighed down by this dejection and fear, he talked in such a bad tone. I cried a lot. Why can't my father understand my line of thinking ? How can I convey What I feel ? Wasn't Baba young once ?

They don't understand this and that is why I sometimes feel that even the love of parents is commercial. Unless their children pay the price of their love it does not ring true. Then may call it a deal if you like. But because of this expectation of a price a person's mind is bound to get perverted. Baba calls me selfish if I start thinking about my future but isn't it guilty of the same crime when he disregards my feelings - even if for the sake of his family ?

What is selfishness and what is selflessness ? Many times this becomes a mystery for me. I think the word selfishness has many faces. From one sides it looks totally like selfishness but gradually it changes it's colour and starts looking like selflessnes. Doesn't what we call selflessness appear selfishness from another angle ?

A psychologist has said that if a person commits an ill deed, we scold him and desparately try to improve him. Truly speaking, we suffer by his being a bad person. Actually, all our efforts to reform him stem from our desire to diminish our desire to diminish our suffering. Parents try to teach their children

discipline to make them good persons . But why do they want them to be good persons at all? Because they want to lesson the grief they would feel if their children do not turn out to become good persons !

That a great `venerable' man sacrifices his selfishness means that he gets pleasure out of it . If he doesn't sacrifices his selfishness, it will make him sad.

If at all this way of thinking is true then no selfless person would get credit for his good deeds . Everybody will say ,"Sacrifice ? It is a shame . All this for his own pleasure . What so very landable about it ?,"

Its worth seeing how scientist go a step ahead and how unfeelingly they think about it .Plato or somebody has said ,"why does the mother feed her baby ? Its because she wants to lessen the pain in her breast caused by accumulation of milk. " When I read this sentence I couldn't believe it. I felt what else can we expect from a heartless scientist ? Such remark for mother ! Then is it surprising that they call other people in the world self-indulgent ?

But if we look at this way of thinking using our experience, we feel that most of it indeed , is true. The feeling of `self'itself attracts selfishness .When I say ` my family, my Aai, my Baba , my brother , my sister 'the love I have for my

family or for these persons is only a cover for selfishness. Selfishness itself takes on the garb of love . Any notions about good and bad, better or worse in others are directly or indirectly connected with my 'self'. It has an effect on my ego. Out of the selfish desire ,that this should be a pleasant effect ,that is ,out of selfishness, I wish well of them all.When the effect of their well being on my ego is no longer pleasing and when only my welfare starts giving me pleasure , then I become selfish. Because I have disregarded others pleasure . I reduced it somewhat.

Isn't it the same case with my parents ? The scope of their selfishness is wider . They look after their children, their own offspring with the same possessiveness and concerned as they have for themselves. Thus they believe that the progress of their family is their progress, their happiness. We call such parents selfless .They themselves also feel so. They give themselves away for their family. They give up every thing of their own of their family. But again the question arises why do they do this? Because it pleases their soul. Whether I talk of my happiness or they talk theirs, We are both being selfish. But the type differ. If a child is dull, lazy, or lacks a sweet voice or is married to a person from a different cast or religion; not one or two but thousands of such things distress the parents. Some things are like a stigma to their family or some are a blot on them and some they feel are a shame on their cast. So parents become sad if their ego in terms of their family, cast is hurt. They dont feel good. They feel that their son 'should not be like this' or ' should not do this'. On

the contrary the son gets pleasure in being exactly `like that' and doing exactly the forbidden things. Their pleasures are of different types. The selfishness of parents takes the name of `love' for caste, religion, race or for their son. But the son has no feelings for caste,religion and race. He only thinks about himself. So he is called selfish. That's the way of the world ! So in short ,everybody is selfish or selfless,depending on the way you look at it. The difference is only of scope.And this scope decides if the person is good or bad.

I am also selfish . I love my parents but only till they don't come in the way of my selfishness. But instead of cursing my feelings, shouldn't they feel that these are natural? Deep within their soul, they may be feeling so! Indeed, those parents who talk like this, are not to be blamed. Its the circumstances which should be blamed. Why just this, let me say it before you say, that the money which parents spend to educate their daughters is of no use from the point of view of repayment.The son repays his father's debt but we only become the cause of that debt. Only a son can be a true security . And now when Baba has passed middle age he must be thinking how good it would have been if he had had a son instead of me.

Aai-Baba had become totally helpless. What could they do? And in this vast world ,what could their children do ? In a house which has a daughter who has completed B.A. and is earning, how can the parents bear to see their remaining children suffering ? In this terrible situation who else could they turn to for help but me?

When such thoughts come into my mind I cannot think of anything else for a while. But then I feel to whom can I turn for support? Isn't it difficult even for me to fight this hard world all alone.These very thoughts compel me to start thinking about my future .

What can I do ? I don't have the courage and strength to live with my four sibilings and call it my family after my parents depart.That is my weakness.I will rever any girl who can do this.

Well, if I decide to remain unmarried for some more days are there any hopes of my parents being in a better condition ? And to say something I shouldn't ,tomorrow if I marry late in life and have children ,will I be able to complete the education of even my first child before I become old ? And what will happen to them if I die before that? then wouldn't my family be worse than Aai-Baba's? How you will laugh at me for thinking about such distant future ! How you will critisize me ! Many parents may even say ,don't educate your daughters so that you won't be insulted by them. May be I have committed the sin of turning parents away from educating their daughters. But what can I do ? The poverty in our country will definitely shake the foundation of our family system. The ties of love of parents for children will also get shaken up. Because of poverty or other reasons, girls will remain unmarried till they reach adulthood and even if it is said that ultimately they would get married , their mixing with men will be considered immoral. On the one hand they will educate their daughters for marriage and on the other they won't accept the

character developed due to education and adulthood .On the one hand there will be this way of thinking of parents and on the other daughters would have their own problems. So how can we find a way out ? Who is to bend in front of whose selfishness ?

At least I don't see any way out of this. It is but natural to think about oneself. Isn't this the way of nature ? The tree blossoms with flowers and fruits . How is it possible for a tree to seek to retain the fruits on it even after they have ripened? The fruits drop down, create new blossoms. That is the law of nature. The tree can never enjoy its own fruit. Then why should both of them grieve over it ? That's why I sometimes feel that in this condition each girl must solve her problem the way she likes to.Nobody else can solve such complicated problems for us .